पिंपरी – १८ लेखा विभाग
क्र. लेखा/२३/वजाती/ ३९४/२०१४
दिनांक :- २०/ ०५ /२०१४

**विषय :- पुरवणी बिलांतील वजातीबाबत.....**

परिपत्रक

महानगरपालिकेच्या सर्व विभागातून काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे पगारातून बँक वसुली, सोसायटी, एल. आय. सी. या वजाती करणेत येत आहेत. सदरचे वजातींचे धनादेश ज्या त्या महिन्यात विभाग निहाय एकत्रीत संबंधीत खात्यात लेखा विभागामार्फत पाठविले जातात. परंतू काही कारणास्तव (रजा, गैरहजर, आजारी) सदरच्या वजाती पुरवणी बिलांमध्ये केल्या जातात. त्यांचे धनादेश कर्मचारी निहाय त्या त्या खात्यात पाठविले जातात परंतु काहि पुरवणी बिले उशिरा प्राप्त होत असल्याने कर्मचारी निहाय माहीती पाठविताना अडचणी येत आहेत. या वजाती संबंधीत खात्यात जमा न झालेमुळे लेखा विभागास वारंवार संबंधीत कर्मचारी येऊन विचारणा करतात.

तरी यापुढे सर्व विभागांना कळविणेत येते की, बँक वसुली, सोसायटी, एल. आय. सी. वजाती पुरवणी बिलामध्ये करणेत येऊ नयेत, उर्वरीत सर्व वजाती करणेत याव्यात. संबंधीत कर्मचाऱ्यांनी सदरच्या रक्कमा वैयक्तीकरित्या भराव्यात याबाबत लेखा विभाग जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

मुख्यलेखापाल
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

प्रती:-
१) सर्व विभाग
२) प्रोबीटी
३) सर्व पगार बिल तपासणी लिपीक